**Set - A**

| CBSE X | **MT EDUCARE LTD.** | Marks : 80 |
|---|---|---|
| | SUBJECT : MARATHI | |
| | **SEMI PRELIM - II** | |
| Date : | **MODEL ANSWER PAPER** | Time : 3 hrs. |

| | | |
|---|---|---|
| | **खंडः 'क'** | |
| **A.1.** | | |
| १. | भगवद्‌गीता, बायबल, कुराण, वेद अशा सदासर्वकाळ बहुमोल असलेल्या ग्रंथांचा उल्लेख केला आहे. | **1** |
| २. | पुस्तकांचे आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असते. | **1** |
| ३. | इतर मित्र कधी रागावतात, कधी चिडवतात तर कधी चेष्टा करतात. कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत. कधी ते आपले अंतरंग खुले करत नाहीत शिवाय ते आपणापासून काहीतरी लपवून ठेवतात. मात्र पुस्तकांचे तसे नाही हाच इतर मित्र व पुस्तक यांत फरक आहे. | **2** |
| ४. | आपण पुस्तकाला जवळ केल्यास ते आपले अंतरंग आपल्यासमोर खुले करते. ते कधी फसवत नाही, कधी चुकवत नाही, नेहमी अगदी आपल्या सेवेसाठी तयार असते. | **2** |
| **A.2.** | | |
| १. | परीक्षेच्या अगोदरचा दिवस कंटाळवाणा असतो. अभ्यास न करता कोरेपणानेच तो दिवस ढकलला जातो. सगळाच अभ्यास चोख झाला तर आपण पहिले येऊ हे टेन्शन असते. पहिले येऊन आपलेच इतक्या वर्षाचे रेकॉर्ड आपण मोडणे योग्य नसते. काय करावे व काय करू नये याचा विचार करत तो दिवस नेटानेटाने कृतीशिवाय ढकलला जातो. | **2** |
| २. | परीक्षेच्या अगोदरचा दिवस लांबच लांब पसरत गेलेला, न संपणारा आणि कंटाळवाणा असा असतो. नव्याने करण्याजोगे काही काम त्या दिवशी नसते. त्या दिवसाआधी जो काही अभ्यास करायचा असतो तो वर्षभरात करून झालेला असतो. जो वर्षभरात झेपला नाही तो त्या शेवटच्या दिवशी उरकण्याची काही आशा नसते. | **2** |
| ३. | प्रत्यक्ष परीक्षेचा दिवस पटकन संपतो. हातात कोरी उत्तरपत्रिका येते. आणि भल्याबुऱ्या प्रकारे दोनअडीच तासांत भरून परत केली जाते. | **1** |
| ४. | समानार्थी शब्द लिहा. | |
| | अ) गंमत - मजा, मौज | **1** |
| | ब) दिवस - दिन | |

खंड: 'ख'

A.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.

१. माझे आजोबा 7

''आजोबा म्हणजेच प्रेम, आजोबा म्हणजेच माया
लहानपणीच्या सुंदर जीवनाची, अखंड छाया''

'आत्मविश्वास' हा आपल्या व्यक्तिमत्वाचा परीस आहे. यशस्वी व्यक्तिमत्वासाठी गरज असते ती शिस्तीची. या शिस्तीमुळेच आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाला मनाजोगे घडवून, ध्येय साध्य करू शकतो. या सर्व गोष्टींचे एक समर्पक उदाहरण आहे माझे 'आजोबा'. माझ्या आजोबांनी फक्त या आत्मविश्वासाच्या बळावरच आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले. अतिशय हलाखीत त्यांचे बालपण गेले. स्वकर्तृत्वावर ते एका साध्या पोलीस शिपायाचे पोलीस निरीक्षक झाले. आज ते जरी निवृत्त झालेले असले तरी जनसेवा करणे त्यांनी बंद केलेले नाही. ते सतत दुसऱ्यांसाठी धडपडत असतात. ते म्हणतात, ''धडपड हे जीवनाचे काव्य आहे.' त्यांच्याजवळ कोणी मदत मागायला गेल्यास तो रिक्त हस्ताने परतलेला नाही. ते नेहमी म्हणतात की, 'या मदतीच्या मोबदल्यात कोणाकडून काही अपेक्षा नाही. कारण प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद मोठा असतो.'

माझे आजोबा सतत कोणत्या ना कोणत्या कामात गुंग असतात. सकाळी उठल्यावर व्यायाम, ध्यान-धारणा झाल्यानंतर एक फेरफटका मारावयास जातात. रस्त्याने जाताना सर्वांशी गप्पा-गोष्टी करत अडलेल्यांना मदत करत, सर्वांना सल्ले देत देत त्यांची सकाळ निघून जाते. घरी आल्यावर वृत्तपत्र वाचून मग आजीला तिच्या घरकामात मदत करतात. दुपारी जेवण झाल्यावर थोडावेळ आराम आणि वाचन. संध्याकाळी मी जेव्हा क्लासमधून घरी जातो, तेव्हा आजोबा माझी वाटच पाहत असतात. मी घरी गेलो की, छानपैकी गप्पा मारत चहापाणी झाले की आम्ही दोघेही फिरायला जातो. फिरत असताना ते सतत माझ्यावर चांगले संस्कार होतील अशा अनेक विषयांवर बोलत असतात. फिरून घरी परतल्यावर माझ्या अभ्यासातही ते मला मदत करतात. आजी कामात असताना आजोबा अगदी एखाद्या मित्राप्रमाणे माझ्याशी खेळतात, गप्पा मारतात, सतत मला प्रोत्साहन देत असतात. आई आणि बाबा कामाला गेल्यानंतर माझी सर्व जबाबदारी आजी-आजोबांची असते.

माझे आजोबा माझ्या बाबांना नेहमी म्हणतात की, 'मला दुधापेक्षा सायच जास्त प्रिय आहे.' अर्थातच प्रत्येक आजी-आजोबांचे आपल्या नातवंडांबाबत हे असेच म्हणणे असते. पण माझ्या आजोबांचे माझ्यावर अतिशय प्रेम आहे. ते सतत माझ्या उज्ज्वल भवितव्याचाच विचार करत असतात. छोट्या छोट्या गोष्टींमधून ते जीवनावश्यक ज्ञान देत असतात. असेच एकदा चाचणी परीक्षेचे पेपर मिळाले होते. त्यावेळी मी गणिताच्या पेपरमध्ये नापास झालो होतो. आई-बाबांना कळले तर ते रागावतील म्हणून मी पेपर मिळाल्याचे लपवून ठेवले. आईने चौकशी केली तेव्हा मी तिच्याशी खोटे बोललो. संध्याकाळी नेहमीप्रमाणे मी आजोबांबरोबर बसून अभ्यास करत होतो. त्यावेळी आजोबांनी गणिताची वही सहजच बघितली. तेव्हा त्यामध्ये मी लपवून ठेवलेला पेपर दिसला.

आजोबांनी मला सकाळी खोटे का सांगितले, याची विचारणा करताच मी माझ्या बचावासाठी अजूनच जास्त खोटे बोलत गेलो. पण आजोबांच्या उलटतपासणीपुढे माझे

| | | |
|---|---|---|
| | पितळ उघडे पडले. मग आजोबांनी मला खूप समजावले. ते म्हणाले, ‘हे बघ बाळा, तू एक खोटं बोललास पण ते लपविण्यासाठी तुला अनेक वेळा खोटं बोलावं लागलं. त्यापेक्षा हेच तू आधीच खरं बोललास असतास तर या सगळ्या गोष्टींची गरजच उरणार नाही. प्रश्न आहे तुझ्या गणिताच्या मार्कांचा! जर तू नीट अभ्यास केलास तर तुला चांगले मार्क्स मिळतील आणि या लपवाछपवीची गरजच उरणार नाही. तेव्हा नीट अभ्यास कर. सर्वात महत्त्वाचे म्हणजे खोटे बोलू नकोस. ही पहिली चूक म्हणून मी काहीही बोलत नाही. पुन्हा असे घडले तर मग मात्र मी तुला कधीच माफ करणार नाही.’ त्या दिवसांपासून मी खोटे बोलायचे नाही, हा निश्चय केला आणि अभ्यासाला लागलो. कदाचित त्याचेच फळ असेल, मी आज माझ्या वर्गात नेहमी पहिला येतो. असे आहेत माझे आजोबा, ज्यांच्यावर मी खूप प्रेम करतो. त्यांच्या चांगल्या संस्कारांमुळेच मी आज सर्वांचाच लाडका बनलो आहे. म्हणून आजोबांविषयी मला म्हणावेसे वाटते ....<br>‘‘आजोबांमुळे जीवनात मिळाले सुख आणि गती<br>त्यांच्या आशीर्वादाने होईल माझ्या आयुष्याची प्रगती’’ | |
| २. | **पाऊस पडला नाही तर ....**<br>‘येरे येरे पावसा, तुला देतो पैसा<br>पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा’<br>असे कितीही म्हटले तरी पाऊस काही येईना. किती लहरी हा पाऊस ! जूनची तीस तारीख सरली, तरी पावसाचा पत्ता नव्हता. एवढेच काय ! पावसाची कुठे चिन्हेही दिसत नव्हती. उकाड्याने माणसे बेजार झाली होती. पावसाचे नक्षत्र कुठे दडी मारून बसले होते ? जमिनीला भेगा पडल्या होत्या. उकाडा अतिशय वाढला होता. पावसाचे आगमन जसे-जसे लांबत होते तसे-तसे शेतकऱ्याच्या तोंडाचे पाणी पळत होते. सर्वजण पावसाची आतुरतेने वाट पाहत होते. आणि मनात शंका आली, पाऊस पडला नाही तर ......<br>हा मनात विचार आला आणि अंगावर शहारा आला. अंग शहारून घाबरून गेले. खरंच पाऊस पडला नाही तर माणसाचे किंबहुना प्राण्यांचे हाल होतील. पावसावरच मानवाचे संपूर्ण जीवन अवलंबून आहे. शेतकऱ्याला तर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरणार नाही. पृथ्वीवरील सर्व सजीव सृष्टीच नष्ट होईल. पाऊस पडला नाही तर नदी-नाले कोरडे पडतील. विहिरी, नद्या, तलाव आटून जातील. पक्षी-प्राण्यांना आणि मानवाला आपली तहान भागवणे अशक्य होईल. पाण्यासाठी लोक एकमेकांचा जीव घेऊ लागतील.<br>पाऊस म्हणजे मानवासाठी अमृत होय. पावसासारखे अमृत जर माणसाला मिळाले तर माणूस अमर होणार नाही पण जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत सुखी मात्र नक्कीच राहू शकतो.<br>आजच्या जमान्यात पाणी हा एक महत्त्वाचा यक्षप्रश्न आहे. तो सोडविणे सहजसोपे | 7 |

जरी नसले तरी अशक्य मात्र नाही. म्हणूनच 'पाणी वाचवा, जीवन वाचवा', असे केवळ न म्हणता त्याचे अनुकरण केले पाहिजे. पाऊस दरवर्षी वेळेवर पडावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने आपल्या पर्यावरणाच्या संवर्धनास हातभार लावला पाहिजे. 'झाडे लावा ...... झाडे जगवा', हा मूलमंत्र मानून जीवनात वृक्षारोपणासारखे पवित्र काम केले पाहिजे.

पाऊस म्हणजे जीवन ! हे जीवन सुखाचे, समृद्धीचे करण्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे. कारण पाऊस पडला नाही तर सर्व सृष्टीचाच नाश होईल. म्हणूनच मनापासून वाटते की पाऊस हा दरवर्षी पडलाच पाहिजे. कारण हा पाऊस आला तर आपण आनंदाने म्हणतो ..............

'आला आला वारा, संगे पावसाच्या धारा
पाठवणी करा, सया निघाल्या सासुरा'

३. **फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त** 7

'मी एक फाटके पुस्तक बोलतोय. अडगळीच्या कोपऱ्यात धूळ खात पडलेलं, प्रत्येक पानाची शिवण उसवून मुखपृष्ठासह फाटलेलं. तुम्हा माणसांची तऱ्हाच न्यारी आहे. आपलं काम झालं की, त्या वस्तूला दूर सारता. आजचं युग संगणकाचं आणि ई-मेलचं युग आहे. हल्ली तर काय म्हणे तुम्ही पुस्तकंसुद्धा संगणकावरच वाचता. हा झाला आजचा काळ, पण तो काळ मी कसा विसरू. त्यावेळेस गदिमा, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, बालकवी, वि.स.खांडेकर यांच्यासारख्या दिग्गज लेखकांच्या शब्दांचा साज आमच्या अंगावर चढायचा. अंगावर मोरपिस फिरावं तसं वाचकाचं बोट माझ्या पानापानावरून फिरत असे.'

'अगदी ज्ञानोबा माऊलीपासून ते काल परवाच्या तुमच्या चंद्रशेखर गोखल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आमचाच आधार घेतला. तुमच्या जीवनाच्या प्रत्येक जडणघडणीत आम्हीच मोलाचा वाटा उचलला. एक काळ असा होता की, साहित्य विश्वाचे दूत म्हणून आम्ही जगभर अभिमानाने मिरवलो. इंग्रजांच्या काळातसुद्धा तुरूंगातील मान्यवरांचे विचार तुरूंगाबाहेर आम्हीच पोहोचवले.'

'मन दुःखी किंवा अस्वस्थ झाल्यास आमचीच साथ धरली जात होती. त्याकाळी खरंच साहित्याची गंगा घरोघरी वाहत होती. दर्जेदार लेखकांबरोबर जाणकार वाचकही त्याकाळी असायचे आणि आमच्यासारख्या पुस्तकावरसुद्धा 'परिसंवाद' घडायचे. तत्वज्ञानाचा आधार घेऊन मनाला स्थैर्य आणण्याचा प्रयत्न व्हायचा. विनोदाची शाल पांघरून वाचक मनोमनी हसायचा. सामाजिक, राजकीय, क्रीडा इ. सर्व क्षेत्रात आमची मुशाफिरी होती. पुस्तक बाजारात येण्याआधी नोंदणी होण्याइतपत आमची दादागिरी होती. दिवाळी अंकावर वाचकांच्या उड्या पडायच्या. जेव्हा विविध संकटे वाट्याला यायची तेव्हा स्वतःला सावरण्यासाठी वाचकांची पावले नकळत आमच्याकडे वळायची. घरात बसल्या बसल्या आम्ही तुम्हाला परदेश सफर घडवून आणायचो. भरकटलेल्या तरूणांना योग्य दिशासुद्धा आम्हीच दाखवायचो. आयुष्याच्या प्रत्येक चढउतारावर, प्रत्येक वळणावर आम्हीच तुमचे मार्गदर्शक होतो.'

'माझ्या पानांचे कित्येक कोपरे आजही दुमडलेले आहेत. तुम्ही वाचता वाचता इथे थांबला

होतात, हे तुम्हाला सांगण्यासाठी. उराशी मी आजही तो सुकलेला गुलाब जपून ठेवलाय. कुणालातरी, कुणाची तरी आठवण म्हणून. भले तुम्ही आम्हाला अडगळीचा कोपरा दाखवला असेल, पण या जीर्ण अवस्थेतही माझ्याकडे आहे बरेच काही तुम्हाला देण्यासारखे.'

काल परवा तो टी.व्ही. काय आला आणि तुम्ही आम्हाला विसरलात. घरभर पुस्तकांचे रकाने अभिमानाने सजवणारे तुम्ही, अचानक आमच्यापासून दूर गेलात. काय तर म्हणे, पुस्तक वाचण्यात वेळ जातो, कंटाळा येतो. तुमचं वाचनच कमी झालंय, तुमचे शब्दसामर्थ्य कमी पडते. दोन-तीन मराठी शब्दांनंतर इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो. तुम्ही जर पुस्तके वाचत असता तर निश्चितच तुमच्याकडेही अमाप शब्द संपत्ती असती आणि शब्दांची वानवा भासली नसती.'

'मी आता फारच थकलोय. जीर्ण झालेल्या पानांसकट माझी कधी होळी होईल, हे सांगता येत नाही. परंतु तुम्हा सर्वांना सांगून जातो, 'वाचाल तर वाचाल'. पुस्तक संस्कृती पुन्हा येऊ द्या, आमच्यासारख्या अडगळीत पडलेल्या फाटक्या पुस्तकांना पुन्हा सुगीचे दिवस पाहू द्या.'

किंवा

<u>आळशी नोकर</u>

साताऱ्याजवळ पाटण तालुक्यात घडलेली गोष्ट. या गावात जयसिंगराव पाटील नावाचे श्रीमंत उद्योगपती राहत होते. त्यांचे वय बरेच झाले होते. खूप मेहनत करून त्यांनी अमाप संपत्ती जमा केली होती. त्यांच्याकडे दोन नोकर होते. **7**

जयसिंगरावांकडे एक कोंबडा होता. तो कोंबडा आरवला की ते उठत आणि नोकरांना उठवून काम करायला सांगत. दोन्ही नोकर अतिशय आळशी होते. पहाटे लवकर उठणाऱ्या कोंबड्याचा त्यांना अतिशय राग होता. पण करणार काय? मालकाची आज्ञा त्यांना पाळावीच लागे. या कोंबड्यालाच मारून टाकले तर पहाटे उठण्याचा त्रास तरी वाचेल असे त्यांना वाटले. पण मालकापुढे त्यांचे काहीच चालेना. त्यामुळे ते मालक घरात नसण्याच्या संधीची वाट पाहू लागले.

नोकर ज्या संधीची अगदी आतुरतेने वाट पाहत होते, ती वेळ आता जवळ आली होती. एके दिवशी जयसिंगराव काही कामानिमित्त पुण्याला गेले. दोन्ही नोकरांनी या सुवर्णसंधीचा फायदा घेतला आणि कोंबड्याला मारून टाकले.

जयसिंगराव परत आल्यानंतर त्यांना आपला कोंबडा कुठेच दिसला नाही. ते बेचैन झाले. त्यांना चिंता वाटू लागली की आता आपल्याला पहाटे कोण उठवणार? त्या चिंतेत त्यांना रात्री झोपही लागेना. त्यामुळे ते वेळी-अवेळी उठत आणि नोकरांनाही उठवत आणि काम करायला लावत. कोंबडा असताना निदान ते पहाटे पाच वाजता तरी उठत; पण आता तर कधी दोन वाजता तर कधी तीन वाजताही जयसिंगराव उठत व नोकरांनाही उठवत. त्यामुळे नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम करावे लागे. आता मात्र त्यांना आपल्या कृत्याचा खूप पश्चात्ताप झाला होता.

<u>तात्पर्य</u> : **माणसाने कधीही आळस करू नये.**

**A.4.** **खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

साधना बोरकर
मु. पो. खडवली,
जि. ठाणे.
दि.१९ नोव्हेंबर,२०१७

प्रति,
मा.विभागीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
ठाणे.

विषय – अनियमित वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी साधना बोरकर, आपल्या विभागातील रहिवाशी असून गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून आमच्या विभागातील वीजपुरवठा अतिशय अनियमित होत आहे. वीज नसल्यामुळे खडवलीसारख्या ग्रामीण भागात आम्हा गावकऱ्यांची अतिशय गैरसोय होत आहे. वयोवृद्ध, आजारी, लहान मुले विशेष करून विद्यार्थी यांना फार मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या तीन दिवसापासून तर गावात वीजच नाही.

वीज नसल्यामुळे गावातील अनेक लहान-मोठे उद्योगधंदे व गिरण्या जवळपास बंदच असतात. तसेच विजेचा दाब कमी-जास्त होत असल्यामुळे घरगुती उपकरणे बिघडतात. त्यामुळे आर्थिक नुकसानही होत आहे. तरी आपण वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपली विश्वासू,
साधना बोरकर

तिकीट

प्रति,

मा.विभागीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
ठाणे.

प्रेषक,
साधना बोरकर
मु.पो.खडवली,
जि.ठाणे.

किंवा

5

सुजित काळे
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानदिप विद्यालय,
भांडूप (पूर्व).
दि.५ जून, २०१७

प्रति,
मा. विभागीय अधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

विषय – शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याकारणाने तक्रार पत्र.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी सुजित काळे, ज्ञानदिप विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या संमतीने आपणास पत्र लिहित आहे. आमच्या शाळेसमोरील रस्ता गेले दोन महिने अतिशय खराब स्थितीत आहे. बऱ्याच वेळा तक्रार करूनही त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. आता ऐन पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यात बरेच पाणी साचत आहे. त्यामुळे रस्त्यावर चालणेच त्रासाचे आहे.

येथे वाहनांची कोंडी होत आहे. विशेष करून शाळा सुटण्याच्या वेळेस फारच गर्दी होते. शिवाय खड्ड्यात पाणी तसेच साचून राहिल्याने तेथे कचरा, घाण जमा होऊन दुर्गंधी व मच्छर यांचा त्रास वाढला आहे. रहदारीची कोंडी झाल्यामुळे सतत गाड्यांचे हॉर्न वाजत असतात.

तरी कृपया या तक्रारीकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नम्र,
सुजित काळे
(विद्यार्थी प्रतिनिधी)

तिकीट

प्रति,
मा.विभागीय अधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

प्रेषक,
सुजित काळे
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानदीप विद्यालय,
भांडूप (पूर्व).

**खंड 'ग'**

| | | |
|---|---|---|
| **A.5.** | **अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही चार)** | |
| १. | अबब ! - केवलप्रयोगी अव्यय | 1 |
| २. | क्रियापद - आहेत | 1 |
| ३. | विशेषण - पांढरा | 1 |
| ४. | शब्दयोगी अव्यय - टेबलावर | 1 |
| ५. | पण - उभयान्वयी अव्यय | 1 |
| ६. | क्रियाविशेषण अव्यय - पटापट | 1 |
| **A.5.** | **आ) कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही दोन)** | |
| १. | कर्तरी प्रयोग | 1 |
| २. | बागेत फेरफटका मार. | 1 |
| ३. | भावे प्रयोग | 1 |
| ४. | प्रत्येकजण स्वयंभू नाही का ? | 1 |
| **A.5.** | **इ) सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही दोन)** | |
| १. | भविष्यकाळ | 1 |
| २. | मुले अभ्यास करतात. | 1 |
| ३. | भूतकाळ | 1 |
| ४. | अक्षय घरी आला होता. | 1 |
| **A.5.** | **ई) लिंग बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १. पुजारी - **पुजारीण**     २. बालक - **बालिका** | 1 |
| | ३. तरूण - **तरूणी**     ४. मालक - **मालकीण** | 1 |

| | | |
|---|---|---|
| A.5. | उ) **वचन बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १. रस्ता - **रस्ते**     २. पोळी - **पोळ्या** | 1 |
| | ३. दुकान - **दुकाने**     ४. केळे - **केळी** | 1 |
| A.5. | ऊ) **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १. पृथ्वी - **धरणी, धरती, वसुधा, अवनी**     २. आभाळ - **आकाश, गगन** | 1 |
| | ३. मित्र - **सखा, दोस्त**     ४. पक्षी - **खग, विहंग** | 1 |
| A.5. | ए) **विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १. आशा × **निराशा**     २. थंड × **गरम** | 1 |
| | ३. आवड × **नावड**     ४. विश्वास × **अविश्वास** | 1 |
| | **खंड 'घ'** | |
| A.6. | अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** | |
| १. | बाहेर आपण **अन्न** मिळवायला फिरावं. | 1 |
| २. | वेदनेचे **आनंदात** कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला. | 1 |
| ३. | खूप विचारांची **दाटी** झाली. | 1 |
| ४. | बाबूजींसाठी कुणाकडेही **वेळ** नव्हता. | 1 |
| ५. | माझी सगळी **सूत्रं** पाठ झालीयेत. | 1 |
| ६. | त्या घरात माझा जीव **गुदमरत** होता. | 1 |
| A.6. | आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** | |
| १. | मंदार सूत्रं पाठ झाली, असे म्हणतो. | 1 |
| २. | सरिता व्यवसायाने 'आर्किटेक्ट' होती. | 1 |
| ३. | नवा दिवस अपूर्वाईनं उगवतो आणि अपूर्वाईनं मावळतो. | 1 |
| ४. | साधनाताई आमटे यांचे लग्नाअगोदरचे नाव 'इंदू घुले' होते. | 1 |
| ५. | लेखिकेच्या घरी उरूसाचा स्वयंपाक रात्रभर अम्मा करत असे. | 1 |
| ६. | पाऊस सुरू झाला की वारूळ वाहून जाते. | 1 |
| ७. | लेखिकेच्या घरात मुस्लीम म्हणून दोन ईद साजऱ्या केल्या जात. | 1 |
| ८. | मुंग्यांची मुलं नागावर रागावली. | 1 |

**A.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन)

१. **2**

**प्रत्येक सणात लेखिकेच्या घरात येणारे पदार्थ**
- पोळी
- वाटाण्याची उसळ
- भाजी - भाकरी
- दिवाळीचा फराळ
- बाजरीचे उंडे
- आमटी
- धपाटे

२. **2**

**आनंदवनाची वैशिष्ट्ये**
- **वेदना** → सहवेदना
- **वनातील आनंद** → आनंदाचं वन
- **दुःख** → सह-अनुभुती
- **भीती** → शांती

३. **2**

**मंदारबद्दल ताईचे मत**
- हा एरवी शहाणपणा करतो.
- एकदा झोपला, की तोंडातले दात जरी कुणी काढून नेले, तरी हा उठणार नाही.

४. **2**

**बाबूजींची दोन अपत्ये**
- केशव
- सरिता

५. **शादुद्दीनवलींच्या तुरबती शेजारील इतर तुरबती** 2

- पत्नी बेबी फातिमा
- छोटा मुलगा मासूम

आ) **खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटरप्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुलं माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होणार असतो पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारुळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. ज्यामुळे सूर्यकिरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वतःही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या. 3

वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते.

२. लेखिका आशा आपराद यांच्या घरात मुस्लीम म्हणून ‘रमजान ईद’ व ‘बकरी ईद’ अशा दोन ईद साजऱ्या केल्या जायच्या. यावेळी लेखिकेची मा खसखस, सुका मेवा, पेढे, गूळ, साखर, दूध आणि शेवया यापासून शिरखुर्मा तयार करायची. सुकं मटण, रस्सा, पुलाव असा स्वयंपाक असे. लेखिकेचे वडील गल्लीत प्रत्येकाच्या घरी जाऊन आमंत्रण देत आणि लेखिकेची आई सर्वांना अगत्यपूर्वक आग्रहानं वाढायची. लेखिकेच्या मैत्रिणी ईद दिवशी जेवायला, नंतर शिरखुर्मा संपेपर्यंत तो प्यायला दोन-तीन दिवस यायच्या. ईदला लहान मुलांना घरातील मोठी माणसे, नातेवाईक पैसे म्हणजे ‘इद्दी’ देतात. अशी ‘इद्दी’ कोणाजवळ जास्त जमते, अशी चढाओढ मुलांमध्ये असायची. नवीन कपडे, भरपूर सुट्टे पैसे अशी मुलांची मजा असे. 3

अशाप्रकारे ईदच्या दिवशी आपराद यांच्या घरी आनंदाचे वातावरण असे.

३. जेव्हा केशवने लेखकाला आपला बंगला दाखवला तेव्हा केशवच्या बंगल्यात लेखकाला माणुसकी कुठेच दिसली नाही. फक्त व्यवहार आणि पैसा दिसत होता. केशव अगदी भरभरून आपल्या बंगल्याचे, एकेक वस्तूचे कौतुक करत होता. ते वर्णन ऐकून, पाहून 3

| | | |
|---|---|---|
| | लेखक थकून गेला होता. त्याचे डोके खूप दुखत होते. तो जेवला आणि तोंडावर पांघरूण घेऊन झोपला. पण त्याला झोप येत नव्हती. तो खूपच अस्वस्थ झाला होता. लेखक विचार करत होता. गावातल्या माणसाला केशवने घरी बोलावले नव्हते तर त्याच्या बंगल्याची श्रीमंती बघायला बोलावले होते. बंगल्याला केशवने 'बाबूजी' नाव दिले होते. पण घरात बाबूजीचं अस्तित्व कुठेच जाणवत नव्हते. साऱ्या गप्पांमध्ये केशवने गावी राहणाऱ्या विधवा आईची साधी चौकशीही केली नव्हती. लेखकाने न राहवून सांगितले तर त्याने ऐकून न ऐकल्यासारखे केले. 'कुठून आपल्याला दुर्बुद्धी सुचली.' असा विचार लेखकाच्या मनात येऊन गेला. स्वतःभोवती विशिष्ट प्रकारचं वलय निर्माण करून जगणाऱ्या माणसाच्या घरात राहण्यापेक्षा बस स्टॅण्डवरच्या बाकावर झोपलो असतो तर शांत झोप लागली असती, असा एक विचार त्याच्या मनात आला.<br>केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात असे वेगवेगळे विचार आले. | |
| ४. | मानसी पुस्तक वाचता वाचता पुस्तकावर झोपी जाते. त्यामुळे ते चुरगळून जाते. त्यामुळे पुस्तकरावांच्या पायाला दुखापत होते. मंदारदेखील रात्री पुस्तक वाचताना तसेच खाली टाकून देतो. त्यामुळे त्या पुस्तकाची पाने मुडपतात आणि पुस्तकरावांचे सारे अंग ठणकत असते. मोठी माणसेदेखील कादंबऱ्या वाचतात. अर्धवट वाचून झाल्यावर खूण म्हणून पुस्तकाचेच पान मुडपतात. तर काहीजण त्यांना माळ्यावर, गाडीच्या डिकीत टाकून देतात.<br>अशाप्रकारे मानसीच्या, मंदारच्या व मोठ्या माणसांच्या वागण्याचा पुस्तकरावांना त्रास होतो. | **3** |
| **A.8.** | **अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** | |
| १. | मातीलाही सुगंध यावा **<u>कष्टाच्या</u>** भाकरीचा. | **1** |
| २. | **<u>हिरवेगार</u>** पीक नाचते काळ्याभोर शिवारी. | **1** |
| ३. | आपण **<u>सावित्रीच्या</u>** ज्योती. | **1** |
| ४. | चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख **<u>प्रणाम</u>**. | **1** |
| ५. | खुरटी **<u>झुडपे</u>** आकाशाला भिडावीत. | **1** |
| ६. | सावरीत जखम खोल, **<u>जगाचा</u>** आला जरी बोल. | **1** |
| **A.8.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| १. | कवयित्रीस जीवन दुर्मिळ, सुंदर वाटते. | **1** |
| २. | स्त्रिया यशोधरेच्या नाती आहेत. | **1** |
| ३. | वाऱ्यावरती बेचैनीचे भाव विरून जात आहेत. | **1** |
| ४. | विषमतेचे दगडगोटे सूर्याच्या उष्णतेने वितळावेत, असे कवीला वाटते. | **1** |
| ५. | कवितेतील आमराई बाभळीच्या बनाशेजारी आहे. | **1** |

**A.9. अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. (कोणतेही एक)**

१. समाजातील विषमता नष्ट होऊन समानता निर्माण व्हावी असे कवीला वाटते. माणसातील माणूसपण जपत असताना त्याच्या कष्टानांही महत्त्व प्राप्त व्हावे, असे त्याला वाटते. कारण कष्टामुळेच माणसाला अर्थ प्राप्त होतो. माणसालाही माणसांच्या कष्टाची किंमत कळावी. माणसांच्या कष्टांना मोल प्राप्त व्हावे, असे कवीला वाटते. **3**

२. कवितेतील स्त्री म्हणते आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सतत दुःख, हालअपेष्टा, अपमान, उपेक्षा सोसत असतो. पण हे सगळे सोसूनही कितीही दुःख असले तरी आपल्याला ते विसरून सतत साऱ्या जगाला म्हणजेच आपल्या कुटुंबाला पोसावं लागतं. आपल्या मनाची माती करून म्हणजेच सारा मान-अपमान विसरून सगळी नातीगोती जपावी लागतात. **3**

३. आपल्या देशात विविधतेत एकता आहे, हे सांगताना कवयित्रीने इंद्रधनुष्याचे उदाहरण दिले आहे. इंद्रधनुष्यामध्ये विविध रंग असले तरी त्यांची कमान मात्र एकच असते. भारतातही अशीच विविधता प्रत्येक गोष्टीत दिसून येते. परंतु, या विविधतेतही सारा देश एकतेचे महान गीत गात आहे. **3**

**A.9. आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही दोन)**

१. **2**

**पुन्हा निर्माण होणारी घरे आणि शहरे यांचे स्वरूप**
- एकाच आकाराची
- एकाच विचाराची
- एकाच उंचीची
- भेदाभेदरहित

२. **2**

**कवी सांगतो**
- **डोळ्यापुढे येणारा** — आठवणीचा गाव
- **वाऱ्यावर विरून जाणारे** — बेचैनीचे भाव

३. 2




**A.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जात असे. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढत आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवत. जुई जेव्हा शाळेतून येत असे, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन यायची. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करत आणि सगळे चहा पीत. जुईची आई पटकन चटमट खाऊ करत असे. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होत असत. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेत असत. जुईची आई स्वयंपाक करत असे. बाबा ताटं घेत. मग सगळे मिळून जेवत असत. 2

अशाप्रकारे जुईचे आईबाबा सहकार्याने घरातली सारी कामे करतात.

२. प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजवताना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकवण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजुरीचा भंडारा, पंढरपुरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते. 2

दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पैलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपुरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण

| | | |
|---|---|---|
| | त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपुरी संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.<br>अशाप्रकारे वरील उदाहरणामुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते. | |
| ३. | चिनार व जुईला आपल्या आईवडिलांना मदत करायची होती पण कोणत्या मार्गाने मदत करावी हे शोधत असताना त्यांना झाडाची कल्पना मनात आली. ज्याप्रमाणे झाड सर्वांना मदत करते. त्याप्रमाणे आपण ही झाडं व्हावे त्यांनी ठरविले आणि भैरु जादूगाराला जाऊन भेटले. भैरू जादूगाराने संमोहित करताच चिनार हा चिंचेचं झाड झाला व जुई चाफ्याचं झाडं होते.<br>अंगभर पसरलेल्या फांद्याच फांद्या, डहाळ्यांवर बसलेले पक्षी, त्यांची घरटी, झाडाखाली उभे असलेले लोक चिनार चिंचेचं झाड बनून सारं पाहात असतो. इतक्यात त्याला तहान लागते. चिनार स्वतःच आपल्या मुळांनी जमिनीत हळूवार हालचाल करून थोडंसं पाणी मिळवतो. तो खूप दमतो. इथे जुई ही खाली बसलेल्या आजोबांना फुलं टाकून खूष करण्याचा प्रयत्न करते. बघता बघता संध्याकाळ होते. पक्षी आपल्या घरांकडे परत येत असतात. झाडरूपी चिनार व जुई दोघं एकमेकांना बघतात. दोघांच्याही मनात विचार येतो. आपल्या घरी आपण नाही पोहोचलो तर काय गोंधळ उडेल? आईबाबांची धावपळ सुरु होईल. आपल्या असल्या वागण्याने त्यांना मदत तर नाही त्रास मात्र नक्की होईल असा विचार करत असतात.<br>अशा प्रकारे चिनार व जुई यांना स्वतः झाड झाल्यावर झाडांना काय त्रास असतो ह्याचा अनुभव आला.<br><br>❖❖❖❖ | 2 |